दिव्य मराठी
भुसावळ
13-08-2026

सतत सावधगिरी बाळगणे हा सायबर ठगीपासून वाचण्याचा एकमेव पर्याय

सांगवी बुद्रूक येथील शाळेत टीना महाजन यांची सायबर सुरक्षेवर जनजागृती

प्रतिनिधी | यावल

व्हिडिओ कॉलवरून पोलिस अधिकारी असल्याचे सांगून भीती दाखवणे आणि डिजिटल अरेस्टच्या नावाने पैसे उकळणे हा फसवणुकीचा प्रकार आहे. अशी कोणतीही डिजिटल अरेस्ट नसते. त्यामुळे असे कॉल आल्यास स्थानिक पोलिसांना तत्काळ माहिती देऊन फसवणूक टाळावी, असे प्रतिपादन सायबर तज्ज्ञ टिना पाटील यांनी केले.

सांगवी बुद्रूक (ता. यावल) येथील ज्योती विद्या मंदिरात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सायबर शिक्षा व सुरक्षा कार्यक्रमांतर्गत जनजागृती कार्यक्रम पार पडला. या वेळी टीना पाटील आणि दर्शना चौधरी यांनी 'हॅकर मास्क'च्या साहाय्याने सायबर फसवणुकीचे प्रात्यक्षिक सादर केले. विद्यार्थ्यांनी ओटीपी, यूपीआय फिशिंग, क्यूआर कोड, केवायसी फसवणूक, पासवर्ड चोरी आणि सोशल मीडियावरील मॉर्फिंगपासून सावध राहावे, असे मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक आर. एस. भंगाळे, तर प्रमुख उपस्थितीत उपमुख्याध्यापक चंद्रकांत फिरके होते. सूत्रसंचालन व आभार प्रसेनजित बाविसकर यांनी मानले. कार्यशाळेत विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी सुद्धा वेगवेगळे प्रश्न विचारले.

अनोळखी लिंकवर क्लिक करण्यापूर्वी विचार करा

सोशल मीडियावर येणाऱ्या अनोळखी लिंक्सवर क्लिक करण्यापूर्वी विचार करावा. अशा लिंक्समुळे मोबाइल हॅक होऊ शकतो. तसेच आपला ओटीपी आणि वैयक्तिक माहिती कुणासोबतही शेअर करू नये. ऑनलाइन सुरक्षिततेसाठी सतर्कता व जागरूकता बाळगणे अत्यंत गरजेचे आहे.